आंजी (मोठी) ता.व जि.वर्धा येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी नव्याने ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्थापना २०१९/ प्र.क्र.३४/आरोग्य-३

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य रुग्णालय मार्ग, मुंबई-४०० ००१.
तारीख: ६ ऑगस्ट, २०१९.

वाचा: आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे /कक्ष-३/टे-२/ प्रा.आ.केंद्र, आंजी (मोठी)/श्रेणीवर्धन/४५९७-९८/१८, दिनांक- ०४.१२.२०१८.

प्रस्तावना -

आंजी (मोठी), ता.व जि.वर्धा वर्धा येथे नव्याने ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन होता.यासंदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय-

आंजी (मोठी), ता.व जि.वर्धा वर्धा येथे नव्याने ग्रामीण रुग्णालय स्थापना करण्यास शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर ग्रामीण रुग्णालयासाठी विहित पध्दतीने जागा अधिग्रहीत करुन बांधकाम करण्याकरीता अंदाज आराखडे तयार करुन प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करण्यात यावेत व पदनिर्मिती करणे याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०६११००३१६११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.08.06 15:00:06 +05'30'

(रो.दि.कदम पाटील)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक-१, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये-राज्यस्तर), मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (प्राआकेंद्र -जिपस्तर), पुणे.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, वर्धा.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, वर्धा.
९. वित्त विभाग,(व्यय-१३) मंत्रालय,मुंबई.
१०. नियोजन विभाग,(का.१४७२) मंत्रालय,मुंबई
११. कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/सेवा-५/अर्थसंकल्प,सा.आ.वि.मंत्रालय,मुंबई.
१२. निवडनस्ती (आरोग्य-३)